# गजानन महाराजांची आरती PDF

**|| गजानन महाराजांची आरती ||**

जय जय सत्चित्स्वरूपा स्वामी गणराया ।
अवतरलासी भूवर जड–मुढ ताराया ।
**।। जयदेव जयदेव ।।धृ।।**

निर्गुण ब्रह्म सनातन अव्यय अविनाशी ।
स्थिरचर व्यापुन उरलें जे या जगताशी ।
तें तूं तत्व खरोखर निःसंशय अससी ।
लीलामात्रे धरिलें मानवदेहासी ।
**।। जयदेव जयदेव ।।१।।**

होऊं न देशी त्याची जाणिव तूं कवणा ।
करूनी गणि गण गणांत बोते या भजना ।
धाता हरिहर गुरूवर तूंचि सुखसदना ।
जिकडे पहावे तिकडे तूं दिससी नयना ।
**।। जयदेव जयदेव ।।२।।**

लीला अनंत केल्या बंकट सदनास ।
पेटविले त्या अग्नीवांचूनी चिलमेस ।
क्षणांत आणिलें जीवन निर्जल वापीस ।
केला ब्रह्मगिरीच्या गर्वाचा नाश ।
**।। जयदेव जयदेव ।।३।।**

व्याधी वारून केलें कैका संपन्न ।
करविले भक्तालागी विठ्ठल–दर्शन ।
भवqसधु हा तरण्या नौका तव चरण ।

pdfinbox.com

स्वामी दासगणूंचे मान्य करा कवन ।

**।।जयदेव जयदेव ।।४।।**

pdfinbox.com

pdfinbox.com